# यावल महाविद्यालयात इंग्रजी सामान्यज्ञान स्पर्धा संपन्न

यावल (प्रतिनिधी) येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज संचलित कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या प्रेरणेने इंग्रजी विभागातर्फे 26 डिसेंबर रोजी महाविद्यालयातील बीए ,बीकॉम व बीएस्सीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते . या स्पर्धेत 139 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

या स्पर्धेत अनुक्रमे प्रेमकुमार रवींद्र काटकर प्रथम, विशाल प्रल्हाद चव्हाण द्वितीय व रूपाली मधुकर महाजन हिने तृतीय क्रमांक पटकावला .स्पर्धेचे आयोजन इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. सुधीर कापडे यांनी केले होते .उपप्राचार्य प्रा. एम .डी .खैरनार , प्रा. ए .पी .पाटील, प्रा. संजय पाटील व विभागाचे सहकारी प्रा .जगदीश चौधरी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# यावल महाविद्यालयात सामान्यज्ञान स्पर्धा

**यावल :** येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या प्रेरणेने इंग्रजी विभागातर्फे नुकतीच महाविद्यालयातील बीए, बीकॉम व बीएस्सीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी सामान्यज्ञान स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत १३९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत अनुक्रमे प्रेमकुमार काटकर प्रथम, विशालचव्हाण द्वितीय व रूपाली महाजन हिने तृतीय क्रमांक पटकावला. विभागप्रमुख डॉ. सुधीर कापडे यांनी आयोजन केले होते. उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार, प्रा. ए. पी. पाटील, प्रा. संजय पाटील व विभागाचे सहकारी प्रा. जगदीश चौधरी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.